


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ४०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२३ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## पावसाने धो धो धुतले! नाशिकमध्ये काही मिनिटांत २४ मिमी पावसाची नोंद

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नाशिक :** शहराला अनेक दिवसांनंतर पावसाच्या जोरदार सरींनी झोडपून काढले. अवघ्या १० ते १५ मिनिटांत ठिकठिकाणी पाऊस धो-धो कोसळला. सायंकाळी साडेपाचपर्यंत शहरात २४ मिमी पावसाची नोंद झाली होती. दरम्यान, हवामान विभागाने मंगळवार आणि बुधवारी जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

पावसाची भुरभूर आणि हलक्या सरी अधूनमधून हजेरी लावत असल्या, तरी अनेक दिवस म ुसळधार पाऊस पडला नव्हता. गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढल्याचा अनुभव नागरिक घेत होते. कामटवाडे, सिडको, राजीवनगर, ठक्कर बाजार, कॉलेज रोड, गंगापूर रोडसह उपनगरांमध्ये टप्प्याटप्प्याने पाऊस धो-धो कोसळला. अवघ्या १५ मि निटांत रस्त्यांवर पाणीच पाणी झाले. ठिकठिकाणी पाण्याची तळी साचली. त्यातून वाट काढताना नागरिकांची तारांबळ उडाली. सिंहस्थ कामांचीही





अनेक ठिकाणी पोलखोल झाली. दरम्यान, जिल्ह्यात सोमवारी सकाळी साडेआठपर्यंतच्या २४ तासांत ०.४ मिमी पाऊस नोंदविला गेला.

**गणेशोत्सवातही गर्दी आटली**

गणेशोत्सवातील देखाव्यांचा आनंद लुटण्यासाठी शनिवार, रविवारी नागरिकांची मोठी गर्दी झाली. गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. परंतु, सोमवारी पावसाने गणेशभक्तांच्या उत्साहावर पाणी फिरविले. बी. डी. भालेकर मैदान, रविवार कारंजा, अशोक स्तंभ, मेन रोड परिसरात तुरळक गर्दी होती. ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली.

**एक्स्लो पॉइंट परिसरात पाणी**

सिडको : सिडको, पाथर्डी व अंबड परिसराला मुसळधार पावसाने झोडपून काढले. गरवारे चौफुली ते एक्सलो पॉइंट डीपी रस्त्याचे कॉँक्रिटीकरण सुरू असताना पाण्याच्या निचऱ्याचे योग्य नियोजन न केल्याने एक्सलो पॉइंट चौकातील अनेक दुकानांत पाणी शिरले. यामुळे इलेक्ट्रिक साहित्य तसेच औद्योगिक कंपन्या व मशिनरीसाठी लागणारे रॉ मटेरियल विकणाऱ्या व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. गरवारे चौफुली ते पपया नर्सरीदरम्यान रस्ता रुंदीकरण व कॉँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. या कामात रस्त्याची उंची तब्बल दोन ते तीन फूट वाढविण्यात आली आहे. परिणामी लगतची दुकाने व कंपन्या रस्त्याच्या तुलनेत खोलगट झाल्याने भविष्यातही येथे पाणी साचण्याची भीती व्यक्त होत आहे.

**सातपूरमध्ये रस्ते जलमय!**

सातपूर : सोमवारी दुपारी एकनंतर सातपूर भागात पावसाने दमदार हजेरी लावल्याने रस्ते जलमय झाले. त्यातच नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यावर सुरू असलेल्या कामामुळे वाहनचालकांना पाण्याने भरलेल्या रस्त्यावरून जाताना अडचणींचा सामना करावा लागला. कॉलनी परिसरातही दमदार पावसामुळे ठिकठिकाणी रस्त्यावर पाणी तुंबले होते.

## अल्पवयीन मुलाच्या हाती दुचाकी खापरखेडा पोलिसांची धडक कारवाई

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२२, नागपूर :** अल्पवयीन मुलांच्या हाती वाहने सोपवणाऱ्या पालकांना खापरखेडा पोलिसांनी जोरदार चपराक दिली आहे. अवघ्या १४ वर्षांखालील मुलाला दुचाकी चालवायला देणे एका पालकाला चांगलेच महागात पडले असून न्यायालयाने संबंधित पालकाला तब्बल ३० हजार रुपयांचा आर्थिक दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे पाल्यांच्या हातात सर्रास दुचाकी सोपवणाऱ्या पालकांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११:४५ वाजताच्या सुमारास खापरखेडा पोलीस पथक रेल्वे चौकी परिसरात नियमित पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी एका अल्पवयीन मुलाला दुचाकी चालवताना पोलिसांनी थांबवले. विचारपूस केली असता त्याने आपले नाव व पत्ता प्रकाश नगर, खापरखेडा असा सांगितला पोलिसांनी तत्काळ त्याच्या पालकांना पाचारण करून कागदपत्रांची पडताळणी केली असता मुलाचे प्रत्यक्ष वय अवघे १३ वर्षे ११ महिने असल्याचे निष्पन्न झाले.

चालक अल्पवयीन असल्याने आणि त्याच्याकडे कोणताही वैध वाहन परवाना नसतानाही पालकांनी त्याला वाहन चालवण्यास दिल्याचे स्पष्ट झाले. खापरखेडा पोलिसांनी तात्काळ ते वाहन जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केले. या गंभीर प्रकरणात मुलाऐवजी पालकांचा निष्काळजीपणा मुख्य कारणीभूत धरून पालक अमित रामनिवास दुबे यांच्याविरुद्ध मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९९ (अ) अन्वये गुन्हा नोंदवून प्रकरण न्यायालयात सादर केले.

न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत कसूरदार पालकाला ३० हजार रुपयांचा दंड ठोठावला. पालकाने न्यायालयासमोर ही दंडाची रक्कम भरल्यानंतरच जप्त केलेले वाहन त्यांना परत करण्यात आले.

**पोलिसांचे पालकांना आवाहन!**

अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देणे त्यांच्या स्वतःच्या आणि रस्त्यावरील इतरांच्या जिवासाठी धोकादायक आहे. कायद्यानुसार अल्पवयीन मुलांनी केलेल्या वाहतूक उल्लंघनाची पूर्ण जबाबदारी पालकांची असते पालकांनी आपल्या पाल्यांचा हट्ट पुरवताना कायद्याचे भान ठेवावे अन्यथा यापुढे अशाच प्रकारची कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांनी स्पष्ट केले.

## नाट्यमय घडामोडी! राहुल बोंद्रे यांनी अचानक निर्णय बदलला !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, बुलढाणा :** राजकारणात शेवटच्या क्षणापर्यंत काहीही निश्चित नसते, याचा प्रत्यय चिखलीच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा येताना दिसत आहे. काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्यांच्या २२ सप्टेंबरच्या पक्षप्रवेशाकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याचे लक्ष लागले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा प्रवेश होण्याची चर्चा होती. मात्र, ऐनवेळी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बोंद्रे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधल्यानंतर बोंद्रे यांच्या भूमिकेत मोठा बदल झाला असून बोंद्रे यांनी काँग्रेसम ध्येच राहण्याचा निर्णय घेतला आहे. या घडामोडीमुळे चिखलीसह बुलढाणा जिल्ह्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

राहुल बोंद्रे यांच्या भाजप प्रवेशाची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर



पक्षातील वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरू झाल्या. त्यानंतर राहुल गांधी यांनी बोंद्रे यांच्याशी थेट संपर्क साधला. व्हॉट्सॲपवर करण्यात आलेल्या या कॉन्फरन्स कॉलवर हर्षवर्धन सपकाळ हेदेखील उपस्थित होते.

या संवादादरम्यान बोंद्रे भावुक झाल्याची आणि त्यांनी आपल्या जुन्या राजकीय संबंधांचा उल्लेख करत काँग्रेससोबतच राहण्याची भूमिका व्यक्त केल्याची माहिती पुढे येत आहे. ‘माझे सर्व काही गेले तरी चालेल; मात्र काँग्रेस सोडणार नाही, मी तुमच्यासोबत राहीन,’ अशा आशयाची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर आज सकाळीही राहुल बोंद्रे यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरून एक पोस्ट शेअर करण्यात आली आहे. राहुल गांधी यांच्या लढ्यात सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, असं या पोस्टमध्ये बोंद्रे यांनी म्हटलं आहे.

> **▶ राहुल बोंद्रे यांचा राजकीय प्रवास...**
>
> राहुल बोंद्रे यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात स्थानिक पातळीवरून केली. त्यांनी सुरुवातीला नगराध्यक्ष म्हणून कार्य केले. राजकारणासोबतच त्यांनी सहकार, शिक्षण, बँकिंग आणि सामाजिक क्षेत्रात २५ वर्षांपेक्षा अधिक काळ मोठे योगदान दिले आहे. ते चिखली विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत.काँग्रेस पक्षाशी त्यांची निष्ठा दीर्घकाळापासून राहिली आहे. त्यांनी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्षपद देखील यशस्वीपणे सांभाळले आहे. जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी ग्रामीण भागात काँग्रेस संघटना बळकट करण्यासाठी मोठे प्रयत्न केले.
>
> **▶ बोंद्रे यांनी आधी काय म्हटलं होतं?**
>
> राहुल बोंद्रे यांनी २० सप्टेंबरला सोशल मीडियावर एक भावनिक व्हिडिओ शेअर केला त्यात आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले होते. सामाजिक, राजकीय वाटचालीमध्ये काँग्रेस पक्षाने विविध संधी आणि पदे दिली. जिवाभावाची अनेक माणसे दिली. संपूर्ण राजकीय वाटचालीमध्ये मी प्रामाणिकपणे काम केले. पद आणि प्रतिष्ठा दिल्यानंतर पक्षासाठी मी देखील दिवसरात्र काम के.ले काँग्रेसचे राष्ट्रीय नेते मुकुल वासनिक यांनी राजकीय वाटचाल घडवली. मार्गदर्शन केले, प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भावासारखे प्रेम दिले. राजकीय आयुष्याच्या वळणावर आका भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे, अशी घोषणा आधी बोंद्रे यांनी केली होती.

## विसापूरच्या ग्रामपंचायत लिपीकाची मृत्यूशी झुंज संपली...

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२२, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील ग्रामपंचायत कार्यालयात लिपीक पदावर कार्यरत तथा म हात्मा ज्योतिबा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक संतोष महादेव निपुंगे (४०) यांचे कर्करोगाच्या आजाराने सोमवारी संध्याकाळी ६ वाजता उपचारादरम्यान चंद्रपूर येथे कर्क (कॅन्सर) रुग्णालयात निधन झाले. त्याला कर्करोग असल्याचे निदान झाल्यावर उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले. त्याचेवर रुग्णालयात उपचार सुरू असताना अखेरचा श्वास घेतला. त्याने तीन दिवस मृत्यूशी झुंज दिली. त्याच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, आई-वडील, भाऊ व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्याच्या अकाली मृत्यूने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

संतोष निपुंगे ऐन तारुण्यात ग्रामपंचायत मध्ये रोजगार सेवक म्हणून रुजू झाले. अल्पावधीत ते लिपीक झाले. त्यानंतर बढतीने जेष्ठ लिपीक पदावर विराजमान झाले. दोन वर्षापूर्वी ते महात्मा जोतिबा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक झाले. अशातच त्यांना कर्करोग असल्याचे निदान झाले. त्यावेळी त्यांनी हैदराबाद येथील नामांकित रुग्णालयात शस्त्रक्रिया चार महिन्याअगोदर केली होती. प्रकृतीत सुधारणा होत होती. दरम्यान केमोथेरपी करण्याचा उपचार चंद्रपूर येथील कर्क रुग्णालयात सुरु होता. मात्र तीन दिवसापूर्वी त्याला रक्ताची उलटी झाली. त्याला उपचारार्थ शुक्रवारी कर्क रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्याने उपचाराला दाद न देता, त्याची प्राणज्योत सोमवारी संध्याकाळी मालवली. त्याच्या पार्थिवावर मंगळवारी विसापूर येथील स्म शानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## भाईंदर नवघर जमीन वादात ७११ कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात नवघर पोलिसात तक्रार दाखल

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२२, मिरा भाईंदर :** जमिनीचा ताबा मूळ म ालकाला देण्याची आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची शिवसेना कार्यकर्त्यांची मागणी

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जम ीन वादात आता एक नवीन वळण आले आहे. वडनगरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत शिक्षण घेतल्याचा दावा करणाऱ्या मो.अजगरभाई वोहरा यांच्या जमिनीच्या मालकी हक्कावरून सुरू असलेल्या वादात, शिवसेना( शिंदे ) कार्यकर्ते मनोज राणे आणि संतोष गोले यांनी ७११ कन्स्ट्रक्शन कंपनी, मुकेश पारेख आणि मर्विन फर्नांडिस यांच्याविरोधात नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यासोबतच, संपूर्ण प्रकरणाची पोलीस, महसूल आणि महानगरपालिका स्तरावर उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

त्यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, अजगरभाई वोहरा यांनी १९८९ पासून नोंदणीकृत असलेल्या खरेदी कराराच्या आधारे जमिनीवर आपली मालकी असल्याचा दावा केला आहे. वोहरा यांनी यापूर्वी या जमिनीसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले होते. ८ सप्टेंबर रोजी त्यांनी मुंबईत




या विषयावर निवेदन दिले आणि संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणीही केल्याचे म्हटले जाते.

यावेळी, ७११ कन्स्ट्रक्शन कंपनीकडून जमिनीचा व्यवहार रद्द केला जात असल्याचे सादर करण्यात आला आहे. तथापि, शिवसेना कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, व्यवहार रद्द करण्याच्या चर्चा होऊनही जमि नीचा प्रत्यक्ष ताबा मूळ मालकाला देण्यात आलेला नाही. प्रसिद्धीपत्रकात असाही दावा करण्यात आला आहे की, घटनास्थळाला भेट दिली असता जमिनीची नोंदवही आणि सुरक्षा व्यवस्था सुस्थितीत आढळली.

कार्यकर्त्यांच्या मते, घटनास्थळी शिंदे शिवसेनेचा भगवा झेंडा आणि धनुष्यबाणाच्या चिन्हासह काही फलकही लावण्यात आले होते. त्यांच्या आरोपानुसार, अशा प्रकारे शिवसेनेला बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी नवघर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

शिवसेना कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे की, जमिनीची मालकी, खरेदी-विक्रीचे व्यवहार, ताबा आणि जागेवर लावलेले फलक यासह सर्व बाबींची सखोल चौकशी करावी आणि त्यात काही बेकायदेशीरपणा आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी. हे नमूद करण्यासारखे आहे की, वरील आरोप शिवसेना कार्यकर्त्यांनी केले आहेत. ७११ बांधकाम कंपन्या आणि इतर संबंधित पक्षांकडून प्रतिसाद मिळाल्यानंतर या प्रकरणातील संपूर्ण सत्य अधिक स्पष्ट होईल.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू
## तीन महिन्यांत चार मनुष्यबळी !

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२२, सावली (चंद्रपूर) :** सावली तालुक्यातील साम गा येथे वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी घडली. मृतकाचे नाव हेमंत अशोक भूरसे (४०), रा. सामदा असे आहे. शेतालगत नेहमीप्रमाणे गुरे राखण्यासाठी गेले असताना त्यांच्यावर वाघाने हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे सामदा परिसरासह जंगलालगतच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हेमंत भूरसे हे सोमवारी सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास आपल्या गुरांची राखण करण्यासाठी शेतालगतचा परिसरात गेले होते. मात्र, नेहमीच्या वेळेत ते घरी परतले नाहीत. सायंकाळपर्यंत ते घरी न परतल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांचा शोध सुरु केला. शोध घेत असताना सामदा- दागोबा रोडजवळ त्यांचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक माहितीनुसार वाघाच्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.




## डॉक्टर तुमचा शत्रू नव्हे!

काही आठवड्यापूर्वीची ही घटना. डोंबिवलीतील महानगरपालिकेच्या एका रुग्णालयात एका बाळाचा जन्म झाला. नाळ बाळाच्या गळ्याभोवती दोनदा गुंडाळलेली होती. म्हणजे परिस्थिती अत्यंत नाजूक होती. त्या नवजात बाळाला अतिदक्षता विभागाची – म्हणजेच एनआयसीयूची गरज होती; पण त्या कक्षातील सगळ्या जागा आधीच भरलेल्या होत्या. त्यामुळे मग डॉक्टर बाळाला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याची धावपळ करत होते, म्हणजे त्यावेळी आवश्यक असे नेमके आपले कर्तव्यच बजावत होते. आणि याच धावपळीत एका लोकप्रतिनिधीने आपल्या समर्थकांसह रुग्णालयात घुसून, रुग्णसेवेत गुंतलेल्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांवर आणि त्या वादात मध्ये पडणाऱ्या परिचारिकांवर हात उगारला. सीसीटीव्हीने टिपलेली ती दृश्ये जेव्हा अखख्या महाराष्ट्राने पाहिली, तेव्हा प्रत्येक संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा आला. ही घटना काही एकमेव नाही. ती एका मोठ्या, चिघळलेल्या साखळीतील फक्त एक कडी आहे. डोंबिवलीतील या हल्ल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच पालघरमध्ये देखील पुन्हा तसाच प्रकार घडला. मग परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली की सर्वोच्च न्यायालयालाच याची दखल घ्यावी लागली आणि महाराष्ट्रातील डॉक्टरांवरील हल्ले हा 'कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न' असल्याचे स्पष्ट शब्दांत नोंदवावे लागले.

या पार्श्वभूमीवर एक क्षण थांबून विचार करा. तुमचा एखादा आजारी नातेवाईक रुग्णालयात दाखल होतो. रात्रभर जागून, स्वतःची झोप-भूक विसरून जो डॉक्टर त्याचा जीव वाचवण्यासाठी झगडतो, त्याच डॉक्टरवर पुढच्याच क्षणी हात उगारला जातो. जो जगवतो, त्यालाच मारायचे, यापेक्षा मोठा विरोधाभास तो कोणता? रुग्णालय ही युद्धभूमी नाही; पण आज महाराष्ट्रातील हजारो डॉक्टरांना, विशेषतः निवासी डॉक्टर आणि परिचारिकांना, दररोज असुरक्षिततेच्या छायेतच आपले काम करावे लागत आहे. अर्थात, हे केवळ आपल्याच राज्यापुरते नाही. भारतीय वैद्यक संघटनेच्या – आयएमएच्या – अभ्यासानुसार, देशातील ७५ टक्क्यांहून अधिक डॉक्टरांनी आपल्या कारकिर्दीत कधी ना कधी कामाच्या ठिकाणी हिंसेचा अनुभव घेतला आहे. म्हणजे वैद्यकीय व्यवसायात हिंसा हा व्यवसायाचा जणू एक अपरिहार्य भाग बनवला गेला आहे, आणि हेच सर्वांत धोकादायक आहे.

**कायदा आहे, पण दात नाहीत :** येथे अनेकांना प्रश्न पडेल, 'डॉक्टरांच्या संरक्षणासाठी कायदा नाही का?' तर कायदा आहे. महाराष्ट्रात सन २०१०पासून 'मेडिकेअर सर्व्हिस पर्सन्स ॲक्ट' अस्तित्वात आहे. या कायद्यानुसार वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ला हा अजामीनपात्र गुन्हा असून, दोषींना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. कागदावर हा कायदा भक्कम वाटतो. मग अडचण कुठे आहे? अडचण अंमलबजावणीत आहे. देशातील जवळपास १९ राज्यांमध्ये असे कायदे असूनही, अनेक वर्षांत त्याखाली शिक्षा झाल्याची उदाहरणे बोटांवर मोजण्याइतकीही नाहीत. बहुतांश वेळा एकतर गुन्हाच नोंदवला जात नाही, किंवा 'तडजोड' करून प्रकरण मिटवले जातं. एका अभ्यासात तर असे समोर आले की, महाराष्ट्रात पोलिसांना कित्येक वर्षे या कायद्याचे अस्तित्वच माहीत नव्हते; त्याबाबत जनजागृती २०१७ नंतर सुरू झाली – म्हणजे कायदा मंजूर झाल्यानंतर तब्बल सात वर्षांनी! जो कायदा पोलिसांनाच ठाऊक नाही, तो सामान्य हल्लेखोराच्या मनात भीती कशी निर्माण करणार? आणि दुर्दैव हे की, हल्ले वाढत असतानाही सरकारची भूमिका बरेचदा 'अस्तित्वातले कायदे पुरेसे आहेत,' अशीच समाधानी राहिली आहे. जिथे इच्छाशक्तीच नाही, तिथे कायदा हा केवळ कागदी वाघ ठरतो. या सगळ्यांत सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे जेव्हा हल्लेखोर हा सामान्य नागरिक नसून सत्तेतील, प्रभावशाली घटक किंवा लोकप्रतिनिधी असतो, तेव्हा तो संदेश आणखीच विषारी असतो. सामान्य माणूस दहा वेळा विचार करील; पण ज्याच्या पाठीशी सत्ता आहे, तो निर्धास्तपणे डॉक्टरांवर हात उगारण्याची हिंमत करतो, कारण त्याला माहीत असते की आपले फार काही वावगे होणार नाही; काही तासांत जामीन मिळेल आणि प्रकरण मिटेल. हा 'मारले तरी काहीच होत नाही,' असा समज जोवर मोडून काढला जात नाही, तोवर कोणताही कायदा निरुपयोगी आहे. येथे मला प्रामाणिकपणे दुसरी बाजूही मांडायची आहे. डॉक्टरांवरचा हा राग शून्यातून जन्मत नाही. तो एका मोडकळीस आलेल्या आरोग्यव्यवस्थेविरोधातील उकळत्या असंतोषाचा उद्रेक असतो. बेड नाहीत, आयसीयूमध्ये जागा नाही, तासन्तास रांगा, अपुरा कर्मचारीवर्ग – या सगळ्या अपयशाचा 'दृश्य चेहरा' म्हणजे तिथे उभा असलेला डॉक्टर. धोरणकर्त्यांनी निर्माण केलेल्या त्रुटींची किंमत मात्र समोरच्या डॉक्टरला मारहाण करून वसूल केली जाते. म्हणूनच सुरक्षेचा प्रश्न सोडवायचा असेल, तर मुळावरही घाव घालावा लागेल; आरोग्यव्यवस्थाच सुधारावी लागेल.

**- डॉ. विनायक शाह**

## नात्यातील कटुता धोकादायक; संवादातून नात्यांमध्ये विश्वासाचा पूल बांधा!



पती-पत्नीच्या नात्यातील वाढती कटुता आणि त्यातून घडणाऱ्या गंभीर घटना ही आजच्या समाजासमोरील चिंतेची बाब बनली आहे. संशयातून पतीने पत्नीचा खून केला किंवा पत्नीने कोणाच्या तरी मदतीने पतीचा खून केला, अशा घटना अधूनमधून कानावर येतात. पती-पत्नीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटना केवळ संबंधित कुटुंबापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण समाजाला अंतर्मुख करायला लावतात. प्रेम, विश्वास आणि समजूतदारपणावर उभे राहणारे नाते जेव्हा संशय, राग, अहंकार आणि द्वेषाच्या भोवऱ्यात सापडते, तेव्हा त्याचे परिणाम किती गंभीर होऊ शकतात, याची जाणीव या घटनांमधून होते. पती-पत्नीचे नाते हे केवळ दोन व्यक्तींमधील नाते नसते, तर दोन कुटुंबांना जोडणारा एक महत्त्वाचा भावनिक दुवा असतो. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर एकमेकांना साथ देण्याचे, सुख-दुःखात सहभागी होण्याचे आणि परस्परांच्या भावना समजून घेण्याचे वचन या नात्यात दिले जाते. संसार म्हटला की मतभेद, वादविवाद, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि अनेक आव्हाने आलीच. मात्र, या आव्हानांना सामोरे जाताना पती-पत्नीमध्ये परस्पर विश्वास आणि समजूतदारपणा असणे अत्यंत आवश्यक आहे. मतभेद होणे स्वाभाविक असले, तरी त्या मतभेदांचे रूपांतर मनभेदांत होऊ नये, याची काळजी दोघांनीही घेतली पाहिजे.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाच्या आयुष्यातील ताणतणाव वाढत आहेत. नोकरी, व्यवसाय, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि बदलती जीवनशैली यांचा परिणाम वैवाहिक नात्यांवरही होताना दिसतो. अनेकदा छोट्या-छोट्या कारणांवरून वाद होतात. सुरुवातीला किरकोळ वाटणारे मतभेद योग्य वेळी सोडवले गेले नाहीत, तर त्यातून मनात कटुता निर्माण होऊ शकते. एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी अबोला धरणे, प्रत्येक गोष्टीत दोष शोधणे, जुन्या चुका वारंवार उकरून काढणे आणि एकमेकांवर अविश्वास दाखवणे यामुळे नात्यातील दरी अधिक रुंदावत जाते. संशय हा वैवाहिक नात्यातील विश्वासाला पोखरणारा सर्वांत मोठा घटक ठरू शकतो. कोणत्याही ठोस कारणाशिवाय जोडीदारावर संशय घेणे, त्याच्या प्रत्येक कृतीचा चुकीचा अर्थ लावणे किंवा त्याच्यावर सतत नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे, यामुळे नात्यातील मोकळेपणा नष्ट होतो. विश्वासाच्या जागी संशयाने आणि प्रेमाच्या जागी भीतीने प्रवेश केला, तर नात्यातील सहजता हरवते. मात्र, नात्यातील कटुतेला केवळ एका व्यक्तीला जबाबदार धरण्याऐवजी परिस्थिती, परस्परांचे वर्तन आणि समस्यांची मुळे समजून घेणेही आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा मानसिक किंवा शारीरिक छळ हा नात्याचा अविभाज्य भाग मानता कामा नये. पती-पत्नीच्या नात्यातील कटुता दूर करण्यासाठी संवाद हा सर्वांत महत्त्वाचा मार्ग आहे. संवाद म्हणजे केवळ आपले म्हणणे दुसऱ्याला ऐकवणे नव्हे, तर समोरच्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, तिच्या भावना समजून घेणे आणि मतभेदांवर परस्पर संमतीने मार्ग काढणे होय. रागाच्या भरात बोललेले शब्द नात्याला खोल जखमा देऊ शकतात. त्यामुळे वादाच्या वेळी संयम राखणे, एकमेकांचा अपमान टाळणे आणि प्रश्न चिघळण्याऐवजी तो सोडवण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. संवादाच्या माध्यमातून अनेक गैरसमज दूर होऊ शकतात आणि नात्यातील विश्वास पुन्हा दृढ होऊ शकतो. काही वेळा मात्र नात्यातील समस्या इतक्या गुंतागुंतीच्या होतात की, केवळ परस्पर संवादाने त्यांचे निराकरण होत नाही. अशा वेळी वैवाहिक समुपदेशक, मानसोपचारतज्ज्ञ किंवा विश्वासार्ह तज्ज्ञांची मदत घेणे उपयुक्त ठरू शकते. समुपदेशन घेणे म्हणजे नाते अपयशी ठरल्याची कबुली नव्हे, तर नाते सुधारण्यासाठी केलेला सकारात्मक प्रयत्न आहे. तसेच नात्यात हिंसा, धमकी किंवा असुरक्षितता असेल, तर सुरक्षिततेला प्राधान्य देऊन विश्वासार्ह व्यक्तींची आणि संबंधित यंत्रणांची मदत घेणे आवश्यक आहे.

पती-पत्नीमधील संघर्षाचा सर्वाधिक परिणाम अनेकदा मुलांवर होतो. घरातील सततचे भांडण, तणावपूर्ण वातावरण आणि असुरक्षिततेची भावना यामुळे मुलांच्या भावविश्वावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वैवाहिक नात्यातील मतभेद सोडवताना मुलांच्या भावनिक सुरक्षिततेचाही विचार केला पाहिजे. कुटुंबातील शांतता आणि सुसंवाद ही मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची बाब आहे.

समाजानेही वैवाहिक नात्यांमधील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. पती-पत्नीमध्ये मतभेद झाले तर त्यांची टिंगल करणे, एका व्यक्तीला दोष देणे किंवा त्यांच्या खासगी आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणे टाळले पाहिजे. गरज पडल्यास योग्य मार्गदर्शन आणि भावनिक आधार देण्यासाठी कुटुंबीयांनी पुढाकार घेतला पाहिजे. नात्यातील समस्या लपवून ठेवण्यापेक्षा त्या योग्य व्यक्तीसमोर मांडण्याचे धैर्य निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेवटी, कोणतेही नाते टिकवण्यासाठी प्रेमाइतकीच विश्वासाची आणि समजूतदारपणाची गरज असते. संसारात मतभेद असू शकतात; परंतु ते विकोपाला जाऊ देणे टाळणे ही दोघांचीही जबाबदारी आहे. संशय, अहंकार आणि राग यांना नात्यावर वर्चस्व गाजवू देण्याऐवजी संवाद, संयम आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. नात्यात कटुता निर्माण झाल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा, कटुता वाढण्याआधी संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे आहे. कारण नाती जोडण्यासाठी अनेक वर्षे लागतात; मात्र ती तुटण्यासाठी कधी कधी एक क्षणही पुरेसा ठरतो. त्यामुळे नात्यांमधील विश्वास जपणे, कटुता वेळीच दूर करणे आणि संवादातून नात्यांना नव्याने बहर आणणे, ही काळाची गरज आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## 'मिनी तलावांची' संकल्पना की पर्यावरणाचा विनाश?

**- विजयकुमार कट्टी**

तलावांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या ठाण्यात गणेशोत्सवासाठी तात्पुरत्या कृत्रिम तलावांऐवजी कायमस्वरूपी 'मिनी तलाव' विकसित करावेत, असा प्रस्ताव अलीकडेच समोर आला आहे. हा विचार वरवर पाहता निसर्गाच्या कुशीत रमणाऱ्या एखाद्या संवेदनशील मनाची साद वाटत असला, तरी जमिनीवरील वास्तव आणि या प्रस्तावाचे दूरगामी व घातक परिणाम पाहता, कायमस्वरूपी मिनी तलाव ही उपायापेक्षा आपल्या ठाण्यासाठी एक नवी आणि गंभीर समस्या




ठरण्याची दाट शक्यता आहे. एक जबाबदार ठाणेकर म्हणून, मी जेव्हा या प्रस्तावाच्या खोलवर जाऊन विचार करतो, तेव्हा मला त्याचे होणारे दुष्परिणाम स्पष्टपणे जाणवतात.

जर आपण शहराच्या विविध भागात किंवा रहिवासी परिसरांमध्ये गणेश विसर्जनासाठी कायमस्वरूपी सिमेंट-काँक्रीटचे मिनी तलाव उभे केले, तर त्यामुळे अनेक भीषण प्रश्न निर्माण होऊ शकतात. आजही आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या म्हणजेच पीओपीच्या मूर्ती आणि त्यावर घातक रासायनिक रंग वापरले जातात. हे तलाव जेव्हा भूजल पुनर्भरण किंवा पाण्याचा निचरा करण्यासाठी वापरले जातील, तेव्हा पाण्यात विरघळलेला हा रासायनिक कचरा थेट आपल्या पिण्याच्या पाण्याच्या जलस्रोतांमध्ये झिरपेल आणि आपल्या भूगर्भातील पाणी कायमचे दूषित होईल.

दुसरीकडे, अशा कायमस्वरूपी तलावांमध्ये वर्षभर पाणी साठवून ठेवावे लागते किंवा ते तसेच पडून राहतात. योग्य देखभालीच्या अभावी हे तलाव डेंग्यू आणि मलेरिया पसरवणाऱ्या डासांचे मुख्य केंद्र बनतील, ज्यामुळे रहिवासी परिसराजवळ आरोग्याची मोठी आणीबाणी निर्माण होईल. याशिवाय, कायमस्वरूपी संरचना म्हणजे केवळ एक खड्डा नव्हे, तर त्यासाठी कोटींच्या घरात सिमेंटचे बांधकाम, पाणी शुद्धीकरण यंत्रणा आणि वर्षभर देखभालीचा प्रचंड खर्च येतो. ठाणेकरांच्या कष्टाच्या पैशातून भरल्या जाणाऱ्या करांचा हा निधी अशा वादग्रस्त प्रकल्पांवर उधळणे पूर्णपणे चुकीचे ठरले. प्रशासकीय दिरंगाईमुळे हे प्रकल्प अर्धवट राहिल्यास ते केवळ कचराकुंडी बनून राहतील. आधीच वाढत्या नागरीकरणामुळे आणि पार्किंगच्या समस्येने त्रस्त असलेल्या आपल्या ठाण्यात, अशा नवीन स्थायी संरचनांसाठी जागा कुठे मिळणार? रहिवासी भागात असे तलाव उभारल्यास वाहतूक कोंडीची समस्या आणखी बिकट होईल आणि नागरिकांची नित्यची गैरसोय होईल.

मग आपला खरा आणि शाश्वत उपाय क्या असला पाहिजे? खरी समस्या तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी तलावांची नसून, आपण वापरत असलेल्या साहित्याची आहे. उत्सव संपल्यावर निघून जाणारे तात्पुरते कृत्रिम तलाव हे मानवनिर्मित काळजीचे उत्तम उदाहरण आहेत. यात जमा होणारा पीओपीचा घातक गोळा आणि रासायनिक चिखल एका जागी गोळा करून सुरक्षितपणे टाकून दिला जातो, ज्यामुळे आपल्या नैसर्गिक तलावांना आणि जमिनीला कोणताही धोका पोहोचत नाही. याला आपण एका सुंदर 'बायोफिलिक' म्हणजेच निसर्गाशी जोडलेल्या चळवळीचे रूप देऊ शकतो. जोपर्यंत आपण पूर्णपणे शाडूच्या मातीच्या किंवा पर्यावरणपूरक मूर्तींकडे वळत नाही, तर कितीही कायमस्वरूपी तलाव उभे केले तरी आपण निसर्गाच्या पाठीत खंजीरच खुपसत राहू.

चला, या संपूर्ण मंथनातून आपण एक कठोर आणि सुजाण धडा घेऊया. प्रशासनावर किंवा महापालिकेच्या तिजोरीवर कायमस्वरूपी प्रकल्पांचा बोजा टाकून आपल्या शहराचे आरोग्य धोक्यात आणण्यापेक्षा, मी स्वतःहून एक पाऊल पुढे टाकतो. आगामी गणेशोत्सवासाठी मी आजच हा सामूहिक संकल्प करतो की आमचा लाडका बाप्पा अत्यंत श्रद्धेने निरोप देताना आमच्या शहराच्या एका थेंबाला किंवा मातीच्या कणालाही आम्ही हानी पोहोचवू देणार नाही. तात्पुरत्या कृत्रिम तलावांचा सार्थ स्वीकार आणि शाडूच्या मातीचा आग्रह, हेच आमच्या लाडक्या बाप्पाच्या चरणी खरे आणि पवित्र समर्पण असेल! गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!

### मध्यमवर्गीय

आहो मध्यम वर्गी
जबाबदारीने वागू
कधीही कर्जमाफी
मुळीचं  नका मागू

हक्क नसे आपणा
कर्तव्यां मात्र जागू
वेळ येता स्वतावर
खुरडत मुढत जगू

जगाची करी चिंता
उगा रात्र रात्र जागू
जमणारं नाही तुले
कशासकुणांस ठगू

तक्रार शब्द विसरा
सुखे महागाई भोगू
येवोत किती संकटे
आपले आपण बघू

हौसकुणाचिडायची
मनावरी ठेवा काबू
बचत नियमित कर
लुटू  द्या बँका खाबू

बँकांना लागेलटाळे
बसूदेआपणा झब्बू
आवाज फोडू नका
कायम भितीनी दबू

शांतते सोसणे जाणे
कितीही कसेही त्रागू
मर्यादेत  सण साजरे
कधीचं  नसे गुलझबू

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## गणेश मूर्तींमुळेच जलप्रदूषण होते का ?

नदीपात्रात किंवा समुद्रात श्री गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यामुळे जलप्रदूषण होत असल्याचा कांगावा काही तथाकथित पर्यावरणप्रेमींकडून केवळ गणेशोत्सवाच्या काळातच केला जातो आणि त्यासाठी मूर्तीदान करण्याचे किंवा मूर्तींचे कृत्रिम हौदात विसर्जन करण्याचे आवाहन गणेशभक्तांना केले जाते. श्री गणेशमूर्तींचे विसर्जन वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्रोत असलेल्या ठिकाणी करावे असा धर्मशास्त्रीय सिद्धांत असून त्यामागील शास्त्रीय कारणही तितकेच महत्वाचे आहे. गणेशोत्सव काळात किती जलप्रदूषण होते याचे कोणतेही परीक्षण आजतागायत करण्यात आलेले नाही किंवा तसा अहवालही कुठे सादर करण्यात आलेला नाही, मग ही नुसतीच आधारहीन बोंब दरवर्षी कशासाठी ? यंदा दीड आणि ५ दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी अनेक नद्यांच्या आणि नैसर्गिक तळ्यांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हे पोलीस गणेशभक्तांना नद्यांमध्ये आणि तळ्यांमध्ये मूर्ती विसर्जन करू देत नव्हते. अशा प्रकारे गणेशभक्तांवर बळाचा वापर करून त्यांना वाहत्या पाण्यात मूर्तीविसर्जन करण्यास मज्जाव करायचा आणि 'यंदा गणेश भक्तांची कृत्रिम हौदांना पसंती' अशा मथळ्याच्या बातम्या प्रसारित करायच्या हा कुठला न्याय आहे ? नद्या आणि समुद्रामध्ये कारखान्यांचे रसायनमिश्रित पाणी आणि सांडपाणी प्रतिदिन मोठ्या प्रमाणात सोडले जाते याविषयी पर्यावरणप्रेमी वर्षभर काहीच बोलताना आढळत नाहीत.

कत्तलखान्यातील रक्त मिश्रित पाणी आणि प्राण्यांचे अवयव नद्यांमध्ये सोडले जातात याकडेही ही मंडळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यामुळे पर्यावरण प्रेमाचे डोस केवळ गणेशभक्तांनाच पाजण्याऐवजी वर्षभर पाणी प्रदूषित करणाऱ्या मंडळींना आणि त्यांना अनिर्बंध सोडणाऱ्या प्रशासनालाही पाजावेत जेणेकरून खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण होईल.

**– सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

This letter was written by  owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore  Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे  मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# मुक्रमाबाद प्राथमिक आरोग्य केंद्रच सलाईनवर

### अपुऱ्या कर्मचा-यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था




**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२२, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रामाबाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, येथील रिक्त पदे तात्काळ भरून आरोग्य केंद्र सुरळीत करावे, अशी मागणी 'अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य'च्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात समितीचे मुखेड तालुका अध्यक्ष शेख सैलानी खादरसाहब यांनी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. मुक्रमाबाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे जवळपास ४० ते ५० गावे व तांड्यातील हजारो नागरिकांच्या सेवेसाठी आहे. परंतु, या आरोग्य केंद्रात अपुरे कर्मचारी असल्यामुळे रुग्णांना वेळेवर योग्य उपचार मिळत नाहीत. सध्या व्हायरल इन्फेक्शनचा प्रादुर्भाव वाढलेला असताना या आरोग्य केंद्रात केवळ ४ कर्मचारी कार्यरत असून, त्यात २ डॉक्टर, १ ए.एन.एम. आणि १ औषध निर्माण अधिकारी यांचा समावेश आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे औषध वाटप, लॅब टेस्टिंग आणि रुग्णवाहिका सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सहायक, कनिष्ठ सहायक, रुग्णवाहिका चालक आणि ४ परिचर ही महत्त्वाची पदे रिक्त असल्या कारणाने रुग्णांना उपचारासाठी त्रास सहन करावा लागत आहे.रुग्नांना योग्य वेळी आरोग्य सेवा मिळावी, यासाठी ही रिक्त पदे तात्काळ भरून प्राथमिक आरोग्य केंद्र सुरळीत चालू करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# गडचांदूर - मुकुटबन रेल्वेमार्गाला ४९३ कोटींची मंजुरी

### खा.धानोरकरांच्या प्रयत्नाला यश; उद्योगांची मालवाहतूक होणार जलद

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक व खाण क्षेत्रासाठी महत्वाची बातमी समोर आली असून, कमुकुटबन ते गडचांदूर दरम्यान ३८.२१ किमी लांबीच्या रेल्वेमार्गासाठी भारतीय रेल्वेने ४९३ केटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या पाठपुराव्यामुळे दक्षिण मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या या बहुप्रतिक्षित प्रकल्पाला यश मिळाले आहे. या नव्या मार्गामुळे मुकुटबन आणि गडचांदूर परिसरातील सिमेंट उद्योग, कोळसा खाणी आणि चूनखडीच्या खाणींमधून होणारी मालवाहतूक अधिक जलद, सुरक्षित व कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे. हा नवीन रेल्वेमार्ग उपलब्ध झाल्यामुळे प्रवासाचे अंतर,




वेळ आणि वाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. तसेच हा मार्ग वर्धा- माणिकगड रेल्वे विभागाला उत्तम पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देणार असल्याने सध्याच्या मार्गावरील वाहतुकीचा अतिरिक्त ताण कमी होईल. रेल्वे मंत्रालयाच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरुन दरवर्षी तब्बल ६.०८ दशलक्ष टन मालवाहतूक होण्याचा अंदाज आहे.

ज्यामध्ये कोळसा, सिमेंट, स्पंज आयर्न, लोखंड, खते आणि अन्नधान्यांचा समावेश असेल. या रेल्वेमार्गामुळे कोळसा आणि सिमेंट उद्योगांना माजरी - नांदेड रेल्वेमार्गाशी थेट जोडणी मिळणार असून, कच्च्या मालाची वाहतूक कमी अंतरातून करणे शक्य होईल. यामुळे बल्लारपूर-नागपूर या अत्यंत गर्दीच्या आणि उच्च घनता असलेल्या रेल्वेमार्गावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. परिणामी, यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यातील तुलनेने कमी रेल्वे जोडणी असलेल्या ग्रामीण व औद्योगिक भागांचा विकास वेग घेईल.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी या मंजूरीबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले की, ही मंजुरी गडचांदूरसह संपूर्ण परिसराच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी महत्वाचा टप्पा ठरेल. या रेल्वेमार्गामुळे उद्योगांना मोठा फायदा तर होईलच, शिवाय प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर दोन्ही दिशेने प्रवासी गाड्या सुरु होणार असल्याने स्थानिक नागरिकांच्या प्रवासाची सोय अधिक उत्तम आणि सोयीस्कर होईल.

# निमगाव वाकडा येथे रेणुका माता मंदिर कलशारोहण व जनार्दन स्वामी महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२,लासलगाव (नाशिक) :** निफाड तालुक्यातील निमगाव वाकडा येथील श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुका माता मंदिराच्या जिर्णोद्धारानिमित्त कलशारोहण व जगद्गुरू जनार्दन स्वामी महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास उत्साहात सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी सकाळी ९ वाजता गावातून श्री रेणुका मातेचा कलश व जनार्दन स्वामी महाराज यांच्या मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि शेकडो कलशधारी महिलांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. येवला-लासलगाव मतदारसंघाचे आमदार तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नातून शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास निधीतून या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. तसेच ग्रामस्थ, दानशूर व्यक्ती व जय बाबाजी भक्त परिवाराच्या सहकार्यातून मंदिराचे देखणे रूप साकारले आहे. निमगाव वाकडा व ब्राह्मणगाव (विंचूर) परिसरात जनार्दन स्वामींच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने मंदिरात त्यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जात आहे.सोहळ्यात दिनांक २१ सप्टेंबर रोजी ह.भ.प. निवृत्ती महाराज रायते, तर मंगळवार, दि.२२ ह.भ.प. निलेश महाराज पवार यांचे कीर्तन रंगणार आहे. मुख्य सोहळा बुधवार, दि.२३ रोजी पार पडणार असून दुपारी ३ वाजता बाबाजींची पालखी मिरवणूक, मूर्ती प्राणप्रतिष्ठा, पूर्णाहुती व कलशारोहण विधी संपन्न होईल. सायंकाळी महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरीजी महाराज यांचे प्रवचन, त्यानंतर महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यास मंत्री छगन भुजबळ, स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिसरातील भाविकांनी या धार्मिक उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विंचूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात अण्णांची १३९ वी जयंती संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** विंचूरयेथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ कला-विज्ञान महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांची १३९ वी जयंती मोठ्या उत्साहात व चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या उत्तर विभाग सल्लागार समितीचे सदस्य सुनील मालपाणी व मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य डॉ.सुजित गुंजाळ व प्रमुख अतिथींच्या हस्ते मिरवणुकीसाठी सजवलेल्या रथातील अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रतिमा पूजनानंतर विंचूर गावातून कर्मवीरांच्या प्रतिमेची ढोल-ताशा व लेझीमच्या निनादात भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'कर्मवीर भाऊराव पाटील की जय', 'मातोश्री लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा विजय असो' आणि 'रयत शिक्षण संस्थेचा विजय असो' या गगनभेदी जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या जयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यालयातील ४० तुकड्यांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रबोधनात्मक उपक्रम ठरले. विद्यार्थ्यांनी शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन, समाज परिवर्तन, आध्यात्मिक विचार आणि देशभक्तीपर गीतांवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कर्मवीरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विचारांचा जागर करत विद्यार्थ्यांनी मिरवणुकीत रंग भरले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य राजेंद्र चांदे यांनी केले.या



सोहळ्यास स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष जगदीश जेऊघाले, ज्येष्ठ सदस्य पंढरीनाथ दरेकर, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अनिल दरेकर, नानासाहेब जेऊघाले, किरण दरेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र गोरे, उपाध्यक्ष सोमनाथ निकम, बागुल सर, पी.के.जेऊघाले, ज्ञानेश्वर गाडे, दत्तात्रय दरेकर, अशोक दरेकर, पत्रकार सुनील क्षीरसागर, अण्णा कुमावत, विनायक जेऊघाले, आहेर सर, सुमनताई दरेकर, संदीप जोशी, आबासाहेब दरेकर, सोनाली कापडणीस, सचिन सालकाडे, योगेश चव्हाण, ढवण सर, किरण सूर्यवंशी, दिनकर चव्हाण, कविता मोरे, राजू मोरे, विजय शिरसाठ, डॉ. सचिन जेऊघाले, अशोक सोनी, मालती जाधव, सतीश शेलार, गणेश कोलते, प्राथमिक विद्यामंदिर मुख्याध्यापिका नीलिमा शिरसाठ, विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार देवढे, उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे, संस्थेचे लाईफ वर्कर व पर्यवेक्षक जयवंत ठाकरे, पर्यवेक्षक सुदाम माळी आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि विंचूर व पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलासरीत 'माफिया' नावाच्या कपड्यांच्या दुकानावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

### मनसेच्या तालुका पदाधिकाऱ्यांचे नगरपंचायतीला निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२२, तलासरी (पालघर) :** तलासरी नगरपंचायत हद्दीतील एका कपड्यांच्या दुकानाला 'माफिया' हे नाव देण्यात आल्याचा आक्षेप घेत, संबंधित दुकानाच्या नावाबाबत चौकशी करून कारवाई करावी तसेच गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका सचिव (रस्ते, साधन सुविधा व आस्थापना) नितेश भेलका यांनी केली आहे. याबाबत त्यांनी तलासरी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनानुसार, तलासरी नगरपंचायत हद्दीत 'माफिया' या नावाने कपड्यांचे दुकान सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर दुकान भर मार्केटमध्ये तसेच महाविद्यालयाच्या शेजारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. 'माफिया' हा शब्द गुंडगिरीशी संबंधित असल्याने अशा नावामुळे तलासरी मार्केट तसेच तालुक्यातील परिसरात चर्चा सुरू असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

सदर दुकानाच्या नावामागे दहशत पसरविण्याचा उद्देश आहे का, याची चौकशी करण्यात यावी. तसेच संबंधित दुकानाच्या नावाबाबत कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी भेलका यांनी केली आहे. दरम्यान, संबंधित दुकानावर कारवाई करून गुन्हा दाखल करावा. अन्यथा महाराष्ट्र




नवनिर्माण सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ही निवेदनातून देण्यात आला आहे. करण्यात आलेल्या कारवाईची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. हे निवेदन तलासरी नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांसह तलासरी पोलीस ठाण्याला प्रत देण्यात आले आहे.

# मोकळ्या भूखंडावर झाडाझुडपांसह कचऱ्याचे साम्राज्य; दुर्गंधीने नागरिक त्रस्त



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** खापरखेडा शहरातील विविध रहिवासी भागांमधील मोकळे भूखंड सध्या झाडाझुडपे आणि कचऱ्याच्या विळख्यात सापडले आहेत. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले असून दुर्गंधी आणि डासांचा त्रास वाढल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. मोकळ्या भूखंडावर घरगुती कचऱ्यासह प्लास्टिक, बांधकामाचे अवशेष आणि विविध टाकाऊ वस्तू उघड्यावर टाकल्या जात आहेत. नियमित साफसफाई अभावी या कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. काही ठिकाणी कचरा, पावसाचे पाणी आणि सांडपाणी साचल्याने डासांच्या उत्पत्तीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. कचरा संकलनाची व्यवस्था नियमित असली तरी मोकळ्या भूखंडावर कचरा टाकण्याची प्रवृत्ती रोखण्यासाठी प्रभावी देखरेख आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सार्वजनिक ठिकाणी अथवा मोकळ्या भूखंडांवर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणीही नागरिकांनी केली आहे. मोकळ्या भूखंडांवरील झाडाझुडपे आणि साचलेला कचरा तातडीने हटविण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबवावी. अशी मागणी ग्राम पंचायत प्रशासनाकडे करण्यात आली आहे. तसेच संबंधित भूखंड धारकांना स्वच्छता राखण्याबाबत सूचना द्याव्यात. कचरा टाकण्यास प्रतिबंध करणारे सूचना फलक लावावेत आणि नियमित निगराणी ठेवावी. अशी मागणी नागरिकांनी केली आहे. केवळ एकदाच स्वच्छता मोहीम राबवून प्रश्न सुटणार नसून, भविष्यात पुन्हा कचरा साचणार नाही. यासाठी नियमित कचरा संकलन, देखरेख आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईची कायमस्वरूपी व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी सांगितले.

# अखेर मेडिकल रुग्णालयातून पसार झालेला मकोकाचा कुख्यात आरोपी बोंमट्या गजाआड

### दुर्ग (छत्तीसगड) येथून पोलिसांनी घेतले ताब्यात

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** मेडिकल रुग्णालय शौचालय खिडकीच्या काचा फोडून चार दिवसापूर्वी ममोकाचा आरोपी शेख समीर उर्फ बोंमट्या रहीम शेख हा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन १९ सप्टेंबर शनिवारला पसार झाला होता. गुप्त माहितीच्या आधारावरून नवीन कामठी पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने सापळा रचून दुर्ग (छत्तीसगड) येथील मृतक मित्राच्या भावाच्या घरून २१ सप्टेंबर रात्रीच्या सुमारास आरोपी बोंमट्याला गजाआड करण्यात यश आले आल्यामुळे पोलिसानी सुटकेचा श्वास सोडला आहे.

खापरखेडा येथील मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने गॅंगवार घडवून आणले होते. याप्रकरणी शेख समीर उर्फ बोंमट्या रहीम शेख मुख्य सूत्रधार सूरज कावळेसह त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.आरोपी बोंमट्याची प्रकृती खालावल्यामूळे १७ सप्टेंबर गुरुवारला उपचारासाठी मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २४ तास पाळत ठेवण्यासाठी दोन पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते, मात्र यादरम्यान १९ सप्टेंबर शनिवारला सकाळी १० ते १०.१५ वाजताच्या सुमारास पोलिसांची नजर चुकवून शौचालयाच्या खिडकीची काच फोडून बोंमट्या पसार झाला होता.

याप्रकरणी अजनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच शहर गुन्हे शाखा व कामठी विभागाची विविध पथके आरोपी बोंमट्याच्या शोधासाठी रवाना झाली होती. चार दिवसांच्या



अथक परिश्रमानंतर आरोपी समीर शेख उर्फ बोंमट्या रहीम शेख दुर्ग येथे आपल्या एका मृतक मित्राच्या भावाच्या घरी असल्याची माहिती नवीन कामठी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांना मिळाली. माहितीच्या आधारावरून कामठी पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने दुर्ग पोलिसांशी संपर्क साधला.

२१ सप्टेंबर सोमवारला रात्री दुर्ग पोलिसांच्या सहकार्याने सापळा रचून बोंमट्याला ताब्यात घेऊन आरोपी बोंमट्याला अजनी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कार्यवाही नवीन कामठी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली विवेक दोरसेटवार, योगेश नालटे, आशिष बागडे आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पनवेल महापालिकेतील वेतन निश्चितीवर १७.३४ कोटींच्या अनियमिततेचा आरोप

## माहिती अधिकारातून कागदपत्रे समोर आल्याचा प्रहार संघटनेचा दावा; २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीची फेरतपासणी करून कारवाईची मागणी

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२२, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतींच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या प्रक्रियेत सुमारे १७ कोटी ३४ लाख रुपयांची आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप प्रहार संघटनेने केला आहे. माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे हा दावा करण्यात आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी रायगड जिल्हा प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील शिरीषकर यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २३ ग्रामपंचायतींचा समावेश झाल्यानंतर तेथे कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समावेशनाची प्रक्रिया करण्यात आली.

यामध्ये प्रथम टप्प्यातील १०५, द्वितीय टप्प्यातील १८३ आणि तृतीय टप्प्यातील ३२ अशा एकूण ३२० कर्मचाऱ्यांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून समावेशनास मान्यता दिल्याचे सांगण्यात आले आहे. यापैकी प्रथम आणि द्वितीय टप्प्यातील २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे. शासनाच्या अटींनुसार महापालिकेच्या आकृतीबंधास आणि सेवाप्रवेश नियमांना मान्यता मिळाल्यानंतर पदनिर्मितीच्या दिनांकापासून संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्याची तरतूद असताना,त्यापूर्वीच्या कालावधीतील वेतन लाभ वेतन निश्चितीत समाविष्ट करण्यात आल्याचा संघटनेचा दावा आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, महापालिका अस्तित्वात आल्यानंतर त्या कालावधीचे वेतन लाभ संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आला. मात्र,ज्या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या नियमित आस्थापनेवरील पदाचा आधार उपलब्ध नव्हता,त्या कालावधीतील आर्थिक लाभ वेतन निश्चितीत समाविष्ट करण्यात आल्यास महापालिकेवर अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचे दिसून येते, असा दावा करण्यात आला आहे.

लेखा विभागाच्या आक्षेपानंतर फेरतपासणी या वेतन निश्चितीच्या प्रकरणात महापालिकेच्या लेखा विभागाने आक्षेप नोंदविल्याचे संघटनेने म्हटले आहे. त्यानंतर संबंधित २८८ कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती आदेशांची तपासणी करून आवश्यक फेरदुरुस्ती करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासणीत या वेतन निश्चितीमुळे महापालिकेचे अंदाजे १७ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आल्याचा दावा प्रहार संघटनेने केला आहे.




> तक्रारदारांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर २०२१ साली आदेश करण्यात आले होते. आता तक्रार नेम की कोणत्या बाबींशी संबंधित आहे, याची माहिती घेण्यात येईल. संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
> **– मंगेश चितळे**
> **आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

या अनुषंगाने २८८ कर्मचाऱ्यांची सुधारित वेतन निश्चिती करण्यात आल्याचे आणि संबंधित नस्ती आयुक्तांसमोर सादर करण्यात आल्याचेही संघटनेने म्हटले आहे. सुधारित आदेश अद्याप का नाहीत? सुधारित वेतन निश्चिती प्रस्तावाला सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. मात्र,म ान्यता मिळूनही संबंधित कर्मचाऱ्यांचे सुधारित वेतन निश्चिती आदेश अद्याप निर्गमित का करण्यात आलेले नाहीत,असा सवाल प्रहार संघटनेने उपस्थित केला आहे.

या आदेशांना झालेल्या विलंबामागील कारणे स्पष्ट करण्यात यावीत तसेच संबंधित प्रक्रियेत कोणत्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची भूमिका होती, याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मूळ वेतन निश्चितीची नस्तीच उपलब्ध नसल्याचा दावा या प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे २८८ कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन निश्चितीची नस्ती उपलब्ध नसल्याचे प्रशासनाने माहितीच्या अधिकाराच्या उत्तरात कळविल्याचा दावा प्रहार संघटनेने केला आहे. मूळ वेतन निश्चितीशी संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसणे ही प्रशासकीयदृष्ट्या गंभीर बाब असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. संबंधित नस्ती नेमकी कुठे आहे, ती कोणाच्या ताब्यात होती आणि ती उपलब्ध का नाही, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी डॉ. सुनील शिरीषकर यांनी केली आहे. चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी. वेतन निश्चितीतील कथित अनियमितता, सुधारित आदेश काढण्यास झालेला विलंब आणि मूळ वेतन निश्चितीची नस्ती उपलब्ध नसणे या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी प्रहार संघटनेने केली आहे. तसेच कागदपत्रे गहाळ होण्यामागे कोणाची जबाबदारी आहे, हे निश्चित करून दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात आयुक्तांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरही सुधारित आदेश निर्गमित करण्यात विलंब होत असल्यास त्यामागील कारणे आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका तपासणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले आहे. दरम्यान,१७ कोटी ३४ लाख रुपयांच्या आर्थिक अनियमिततेचा आरोप हा प्रहार संघटनेने उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे केलेला दावा आहे.

या प्रकरणातील अंतिम आर्थिक जबाबदारी, नियमभंग झाला आहे की नाही आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका काय आहे, हे अधिकृत चौकशी किंवा महापालिका प्रशासनाच्या स्पष्टीकरणानंतरच स्पष्ट होणार आहे.

# बोंडारवाडी धरणाची ट्रायलपीट नेमकी का रखडली ?

## शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेचा दोष की विस्थापितांचा तीव्र विरोध?

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२२, जावली (मेढा) :** बोंडारवाडी धरणाची रखडलेली ट्रायलपीट पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली असून,बोंडारवाडी धरण कृती समितीचे निमंत्रक स्व.विजयराव मोकाशी यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त ज्येष्ठ नेते डॉ.भारत पाटणकर यांनी ट्रायलपीट होत नसल्याबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. ट्रायलपीट का होत नाही, हे अनाकलनीय आहे, असे मत व्यक्त करत त्यांनी यामागे शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेचा स्पष्ट दोष असल्याचे म्हटले.



तसेच, येत्या ३० नोव्हेंबर रोजी आंदोलन आणि त्यानंतरही जोपर्यंत ट्रायलपीट होऊन अहवाल नाशिकच्या संबंधित विभागाकडे पुढील योग्य कार्यवाहीसाठी जात नाही तोपर्यंत बेमुदत आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला.म त्र, ट्रायलपीट रखडण्यामागील प्रत्यक्ष घटनाक्रम पाहता या प्रश्नाला दुसरी ही महत्त्वाची बाजू आहे.

बोंडारवाडी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या कुटुंबांकडून प्रस्तावित ट्रायलपीटला तीव्र विरोध केला जात आहे. या विरोधाच्या पार्श्वभूम ीवर संबंधित प्रशासकीय यंत्रणेने ट्रायलपीटच्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला असल्याचे समोर येते. मात्र, स्थानिक नागरिकांनी महिला व मुलांसह रस्त्यावर ठिय्या देत प्रशासनाचा मार्ग रोखला. त्यामुळे परिस्थिती चिघळण्याची आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली.अशा परिस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बळाचा वापर करून ट्रायलपीट करण्याऐवजी परिस्थितीचा विचार करून माघार घेतली, अशी या प्रकरणाची दुसरी बाजू आहे.त्यामुळे आता मूळ प्रश्न असा निर्माण होतो की, ट्रायलपीट रखडल्याचा संपूर्ण दोष शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेवरच टाकणे कितपत योग्य आहे?प्रशासकीय यंत्रणा ही शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा असली, तरी प्रत्यक्ष जागेवर स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असेल आणि त्यातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल, तर प्रशासनाने कोणत्या पद्धतीने पुढे जावे, हा स्वतंत्र प्रश्न आहे. अशा वेळी केवळ अधिकारी घटनास्थळी गेले नाहीत. म्हणून त्यांना दोष देण्याऐवजी विस्थापितांचा विरोध दूर करण्यासाठी शासनाने कोणती ठोस भूमिका घेतली, त्यांच्याशी संवाद साधला का,आधी पुनर्वसन,मग धरण हा कायदा असल्याने त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कितपत मार्गी लागणार आणि प्रशासनाला आवश्यक पोलीस बंदोबस्त व शासनस्तरीय पाठबळ देण्यात आले का, हे तपासणेही आवश्यक ठरते.

विशेषतः धरणामुळे विस्थापित होणाऱ्या नागरिकांचा विरोध हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून त्यांच्या जमीन, घर, पुनर्वसन आणि भवितव्याशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे ट्रायलपीटच्या प्रक्रियेला गती देताना या विरोधाची कारणे समजून घेऊन त्यावर तोडगा काढणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे बोंडारवाडी धरणाचा ट्रायलपीट रखडण्यामागे प्रशासन दोषी किंवा स्थानिक नागरिक दोषी एवढ्या सरळ चौकटीत हा प्रश्न बसत नाही. प्रत्यक्षात विस्थापितांचा विरोध, कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती, प्रशासकीय पातळीवरील अडचणी आणि शासनस्तरावरील निर्णयक्षमता या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे.

५४ गावांचा वाढता असंतोष यामुळे डॉ.भारत पाटणकर यांनी ३० नोव्हेंबरला आंदोलन आणि त्यानंतर बेमुदत साखळी आंदोलनाचा इशारा दिल्याने आता शासनासमोरही हा प्रश्न अधिक गांभीर्याने हाताळण्याचे आव्हान उभे राहिले आहे. ट्रायलपीट करायचा असेल तर प्रशासनाला केवळ आदेश देऊन भागणार नाही; विस्थापितांचा विरोध कसा दूर करणार, कायदा-सुव्यवस्था कशी राखणार आणि शासनस्तरावर कोणता तोडगा काढणार, याचे उत्तरही द्यावे लागणार आहे.

बोंडारवाडी धरणाची ट्रायलपीट रखडली आहे; पण खरा प्रश्न अजूनही ५४ गावातील नागरिकांना सतावतोय तोच - अडथळा नेमका कुठे आहे आणि तो दूर करण्याची जबाबदारी कोणाची?

# खारघर, नवीन पनवेलमधील डायलिसिस सेंटरच्या कामांची पाहणी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, पनवेल :** महानगरपालिका क्षेत्रातील मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोफत डायलिसिस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खारघर सेक्टर-३६ आणि नवीन पनवेल सेक्टर-६ येथे प्रत्येकी २५ खाटांची दोन अत्याधुनिक डायलिसिस केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या कामांची अतिरिक्त आयुक्त (।) गणेश शेटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह पाहणी करून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

खारघर येथील प्लॉट क्रमांक १७ आणि नवीन पनवेल येथील G1 येथे ही केंद्रे उभारण्यात येत आहेत. पाहणीवेळी मुख्य अभियंता राजेश कर्डिले, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, अभियंता प्रीतम पाटील, अभियंता दिलीप बोकाडे, कनिष्ठ अभियंता महेश वाघमारे, विद्युत विभागप्रमुख किरण जाधव, सल्लागार व ठेकेदार उपस्थित होते.

दोन्ही केंद्रांमध्ये आयसीयू दर्जाच्या सुविधा आणि आधुनिक डायलिसिस मशिन्स उपलब्ध असतील. प्रत्येक केंद्रात तीन शिफ्टमध्ये दररोज १०० रुग्णांवर उपचार करता येणार असून, दोन्ही केंद्रांतून दररोज २०० रुग्णांना सेवा देण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आठवड्यात सुमारे ६०० रुग्णांना तीन वेळा मोफत डायलिसिस सेवा मिळणार असल्याने प्रतीक्षा कालावधी कमी होण्यास मदत होणार आहे.

प्रत्येक केंद्रातील २५ खाटांपैकी ५ खाटा हेपेटायटिस बी/सी आणि एचआयव्ही बाधित रुग्णांसाठी, २ खाटा गर्भवती महिला व बालकांसाठी, तर २ खाटा पालिकेच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तज्ज्ञ नेफ्रोलॉजिस्ट, डायलिसिस डॉक्टर, प्रशिक्षित तंत्रज्ञ व परिचारिका पूर्णवेळ कार्यरत राहणार आहेत. उपचारादरम्यान रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्यास पालिकेच्या रुग्णवाहिकेतून त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करून वैद्यकीय पथकाकडून पुढील पाठपुरावा केला जाणार आहे.

# थोडक्यात बातम्या

## दुचाकी चोरटा गजाआड ; देहेगाव (रंगारी) परिसरातील घटना



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** एका महिन्यांपूर्वी दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीला खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने देहेगाव (रंगारी) परिसरातून ताब्यात घेऊन २१ सप्टेंबर सोमवार रात्री उशिरा अटक केली आहे. २२ सप्टेंबर मंगळवारला न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.

प्राप्त माहिती नुसार रोहित उर्फ पप्पू निरंजन राने (२७) टेकमा जिल्हा शिवणी मध्यप्रदेश असे अटक करण्यात आलेल्या दुचाकी चोरट्याचे नाव आहे. फिर्यादी गौरव शैलेंद्र खडसे, देहेगाव (रंगारी) हनुमान मंदिर वार्ड क्रमांक ३ यांच्या आत्याचे सात वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या नावे असलेली दुचाकी क्रमांक एमएच-४०-एएल-९०४१ फिर्यादी शैलेंद्र खडसे वापर करत होते. २४ ऑगस्ट २०२६ रोजी दुचाकी घरी अंगणात ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरी केली होती

यासंदर्भात खापरखेडा पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करण्यात आली होती. तपासा दरम्यान साई मंदिर परिसरात एका घराचे बांधकाम करणाऱ्या एका मजुराने दुचाकी चोरी केल्याची माहिती डीबी पथकाला मिळाली. माहितीच्या आधारावरून आरोपी रोहित राने याला ताब्यात घेतले. पोलीस खाक्या दाखवताच दुचाकी चोरी केल्याची कबूली देऊन दुचाकी झाडीत लपवून ठेवल्याचे सांगितले.

आरोपी रोहित राने याने दुचाकी चोरी केल्या पासून झाडीत लपवून ठेवली होती. एकदोन दिवसात दुचाकी घेऊन पसार होणार होता. मात्र पोलिसांच्या हाती लागला. खापरखेडा पोलिसानी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. दुचाकी जप्त केली असून एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव पोलीस हवालदार संदीप सगणे, आशिष मेश्राम, बादल गिरी, शेखर वानखेडे कार्यवाही केली.

## कोथरूडच्या ग्रामगणपतीचा अनोखा वारसा !

### व्ही.शांताराम यांनी भेट दिलेल्या लाकडी मूर्तीची परंपरा आजही कायम

**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**




**दि.२२, कोथरूड :** स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच १९४४ मध्ये सर्वधर्मीय एकतेचे प्रतीक म्हणून स्थापन झालेल्या कोथरूडच्या ग्राम गणपतीचा इतिहास अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. या मंडळाच्या गणेशोत्सवाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वाचा मोठा वारसा लाभला आहे.

**चित्रपटसृष्टीचे दिग्गज व्ही. शांताराम यांचे योगदान :** स्थापनेच्या काळात ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनी आपल्या स्टुडिओमध्ये 'पांगिरा' या विशेष लाकडापासून गणपतीची मूर्ती साकारून मंडळाला भेट दिली होती. ऐतिहासिक मूल्य असलेली हीच लाकडी मूर्ती आजही अत्यंत जतन करून दरवर्षी गणेशोत्सवात पूजली जाते.

**८० फुटी 'उज्जैन महाकालेश्वर' मंदिराचा भव्य देखावा :** यंदाच्या गणेशोत्सवात भाविकांसाठी उज्जैनच्या प्रसिद्ध महाकालेश्वर मंदिराची हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली आहे. तब्बल ८० फूट उंच असलेल्या या भव्य देखाव्यात महाकालेश्वर मंदिराच्या परंपरेनुसार धार्मिक विधी आणि पूजा-अर्चा संपन्न होणार आहेत. याशिवाय स्थानिक वारकरी संप्रदाय आणि भजनी मंडळांच्या भजनांचे आयोजनही करण्यात आले आहे.

**'एक वही, शिक्षणासाठी': सामाजिक उपक्रम :** पर्यावरण आणि सामाजिक भान जपत मंडळाने यंदा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. श्रींच्या चरणी नारळ अर्पण करण्याऐवजी भाविकांनी एक वही भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून जमा होणाऱ्या सर्व वह्या गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोफत वाटल्या जाणार आहेत.

## शेतकरी मदतीसाठी कृषी विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**




**दि.२२, शिरपूर :** एल-निनोच्या संभाव्य परिणामां ळे निर्माण होऊ शकणाऱ्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्यासाठी कृषी विभागातील तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण सामाजिक निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघ, पुणे तसेच महासंघाशी संलग्न तांत्रिक अधिकारी व कर्मचारी संघटनांमधील एकूण १४ हजार ४४५ अधिकारी व कर्मचारी आपल्या एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणार आहेत.

कृषी विभागात कार्यरत एकूण १८ हजार ६२२ पदांपैकी तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकरी संकटात सापडल्यास त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार सप्टेंबर २०२६ महिन्याच्या वेतनातून एक दिवसाचे वेतन स्वेच्छेने कपात करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

शेतकरी हा कृषी विभागाच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी स्वेच्छेने या उपक्रमात सहभागी होत आहेत, अशी भूमिका कृषी विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

शिरपूर तालुका कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारीही या सामाजिक उपक्रमात सहभागी होणार असून, शेतकरी हितासाठी शासनाकडून आवश्यक सहकार्य मिळेल, असा विश्वास तालुका कृषी अधिकारी कैलास गोपाळ यांनी व्यक्त केला.